**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**जुने जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, पोस्ट ऑफिस शेजारी, नाशिक - 422001**
**दुरध्वनी क्र. 0253-2977374 Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/जुन -इतिवृत्त/237/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
2 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
3 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
4 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
7 मा.सह आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
8 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
9 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
12 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
13 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14 मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ नाशिक
15 मा.सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक
16 मा.सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग.
17 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
18 मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
19 मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
20 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
21 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
22 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
23 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.
24 मा.कार्यासन अधिकारी, ना.त्र्यं.कुं.मे.प्रा.कार्यालय, नाशिक

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे दि.10/06/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दि.10 जुन 2026 रोजी मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त व सादरीकरण या सोबत पाठविण्यात येत असून इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

**आपला विश्वासु**

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 06-07-2026 15:36:32

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर..**

१) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र.

२) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.जिल्हाधिकारी, नाशिक

# दि.१०.०६.२०२६ रोजीचे ऑनलाईन बैठकीस उपस्थितांची यादी

| | |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, नाशिक. |
| २ | जिल्हाधिकारी, आहिल्यानगर |
| ३ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर |
| ४ | पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. |
| ५ | अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक. |
| ७ | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक |
| ८ | कार्यकारी अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक. |
| ९ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. |
| १० | अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |
| ११ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण. |
| १२ | सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक |
| १३ | उपयुक्त नियोजन विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक |
| १४ | जिल्हा माहिती कार्यालय |
| १५ | सह संचालक,नगर रचना विभाग, नाशिक |
| १६ | वन विभाग (प) |
| १७ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक |

**नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची दि. १०/०६/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

दि. १०/०६/२०२६ रोजी डॉ. श्री. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांची यादी आणि केलेली सादरीकरणे सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीला सुरुवात झाली.

**विषय क्र. १ :- दि. ०८.०५.२०२६ रोजीचे बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा आयुक्त यांनी दि.०८/०५/२०२६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता देण्याबाबत सर्व प्राधिकरण सदस्यांना विनंती केली त्यानुसार प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्ताला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा.अध्यक्ष महोदयांनी सदर बैठकीतील विषयांना शिखर समितीची मान्यता तसेच तांत्रिक मान्यता/सहमती (Technical Sanction / Approval) आहे काय? याबाबत विचारणा केली तेव्हा कुंभमेळा आयुक्त यांनी सदर विषयांना शिखर समितीची मान्यता असलेची व ज्या प्रकल्पांना आवश्यक आहे त्या प्रकल्पांकरीता तांत्रिक मान्यता देण्यात आली असल्याचे नमूद केली. तसेच मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना केली की, यापुढे प्राधिकरणास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना आवश्यक त्या प्रशासकीय आणि वित्तीय पूर्तता झाल्याची खात्री करावी.

**विषय क्र. २ :- सिंहस्थ कुंभमेळा दरम्यान नाशिक शहर विभाग १ परिसरातील विद्युत यंत्रणा बळकटीकरणासाठी नविन ३३/११ के.व्ही. व अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे यास प्रशासकीय मान्यता देणे बाबत..**

अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी माहिती दिली की, आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नवीन ३३/११ केव्ही अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारण्यासाठी रु. २.७२ कोटी इतकी प्राशकिय मान्यता प्राप्त आहे. सदर ठिकाणी ३३/११ केव्ही उपकेंद्र सिव्हिल येथे अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे प्रस्तावित होते. परंतु सदर ठिकाणी नवीन ३३/११ के.व्ही. सिव्हील (जी.आय.एस.) उपकेंद्र उभारणे प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे ३३/११ केव्ही उपकेंद्र सिव्हिल येथे १० एम. व्ही. ए. अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे ऐवजी ३३/११ केव्ही उपकेंद्र तपोवन येथे १० एम. व्ही. ए. अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे प्रस्तावित केलेले आहे. तसेच आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक यांनी ७.०७३ एम.व्ही.ए.+८ एम.व्ही.ए. = १५.०७३ एम.व्ही.ए. अतिरिक्त विद्युत भाराची मागणी केली आहे. सदर प्रस्तावित अतिरिक्त भाराची पूर्तता करण्यासाठी नविन ३३/११ के.व्ही.सिव्हील (जी.आय.एस.) उपकेंद्र उभारणे आवश्यक आहे. सदर वाढीव मागणी लक्षात घेता विद्यमान विद्युत यंत्रणेचे बळकटीकरण करणे आवश्यक असल्याची बाब नमूद केली.

सबब, प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.१२.५१ कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ३ :- हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक (ओझर) येथे नवीन इंटिग्रेटेड टर्मिनल इमारत बांधकाम करणे व अनुषंगिक कामे प्रांगण, वाहतूक, एप्रन, एअरसाइड, एअरपोर्ट सिक्युरीटी इक्विपमेंट, परिसर विकास इ., ता. दिंडोरी, जि. नाशिक प्र. मा. च्या १०% च्या आतील वाढील वावास व अतिरीक्त बाबींस प्रशासकीय मान्यता देणे बाबत..**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, यांनी हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड नाशिक (ओझर) येथे नवीन इंटिग्रेटेड टर्मिनल इमारत बांधकाम करणे व अनुषंगिक कामे या कामास दि. ३०/११/२०२५ च्या आदेशान्वये नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत ५७२.५१ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली

आहे. सदर कामासाठी BCAS व DGCA मार्फत मिळणाऱ्या Approval च्या अनुषंगाने मंजूर निवेदेच्या काही बाबींमध्ये वाढ होत असून काही अतिरीक्त बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर वाढीव वावाची व अतिरीक्त बाबींचे किंमतीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विनंती केली. मा. अध्यक्ष महोदयांनी सदर वाढीस प्रशासकीय मान्यता देणे गरजेचे आहे काय किंवा कसे याची खात्री करावी, अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांनी सदर प्रकरणी सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याचे नमूद केले.

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, यांनी माहिती दिली की, निविदा स्विकृत केल्यानंतर कामाची अंतिम रक्कम (सर्व कर व खर्च समाविष्ट करुन) रुपये- ५९८.४४ कोटी मान्य करण्यात आली आहे. सदरची रक्कम मूळ प्रशासकीय मान्यता रक्कम रु. ५७२. ५१ कोटी या रक्कमेमध्ये एकूण रक्कम रु. २५.९३ कोटींनी वाढ झाली आहे. BCAS व DGCA मार्फत मिळणाऱ्या Approval च्या अनुषंगाने मंजूर निवेदेमधील काही बाबींमध्ये/घटकांमध्ये वाढ होणार असून काही अतिरीक्त बाबींचा समावेश करणे आवश्यक असल्यामुळे त्याकरीता अतिरिक्त रक्कम रु. ३०.९७ कोटीची आवश्यकता आहे. अश्याप्रकारे एकूण वाढीव रक्कम रु. ५६.९० कोटी निधीची या कामाकरीता आवश्यकता आहे. तरी 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक (ओझर) येथे नवीन इंटिग्रेटेड टर्मिनल इमारत बांधकाम करणे व अनुषंगिक कामे प्रांगण, वाहतूक, एप्रन, एअरसाइड, एअरपोर्ट सिक्युरीटी इक्विपमेंट, परिसर विकास' (मूळ प्रशासकीय मान्यता रक्कम रु. ५७२.५१ कोटी) या कामास एकूण रक्कम रु. ६२९.४१ कोटीची सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे.

यावर कुंभमेळा आयुक्त यांनी नमूद केले की, सदरच्या कामाला पायाभूत सुविधा समितीकडे सादर केले त्यावेळी सदर कामाकरीता कोणतीही अतिरिक्त रक्कम आवश्यक असणार नाही असे यंत्रणेकडून कळविण्यात आले आहे. परंतु कामाची निकड व BCAS व DGCA मार्फत Approval मिळविण्याच्या अनुषंगाने मानकांच्या प्रतिपुर्तीकरीता सदरच्या अतिरिक्त मागणीस मान्यता देणे आवश्यक आहे.

सबब, प्राधिकरणाच्या वतीने एकूण रक्कम रु.६२९.४१ कोटीचे कामांस (रु. ५६.९० कोटी वाढीव ) सर्वानुमते सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ४ :- आपत्ती व्यवस्थापन नियोजन, जोखीम मूल्यांकन, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा विकास, विभागीय समन्वय, SOP/IRS/ESF विकसित करणे इत्यादी कामांसाठी तज्ज्ञ सल्लागार संस्था Non Information Technology परंतू तांत्रिक सहाय्य (Technical support) करणाऱ्या PMU संस्था Palladium Consulting India Pvt. Ltd.यांची नाशिक त्र्यंबक कुंभमेळा प्राधिकरण नाशिक स्तरावर नियुक्ती करण्याबाबत..**

कुंभमेळा आयुक्त यांनी आपत्ती व्यवस्थापन नियोजन, जोखीम मूल्यांकन, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा, विभागीय समन्वय, आपत्कालीन पूर्वसूचना प्रणाली, SOP/IRS/ESF विकसित करणे इत्यादी कामांसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास तांत्रिक सहाय्य (Technical support) करणाऱ्या PMU संस्था Palladium Consulting India Pvt. Ltd. यांची नाशिक—त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक स्तरावर नियुक्ती करणेबाबत माहितीचे सादरीकरण केले. तसेच सदर संस्था ही राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकरीता नियुक्त केलेलीच संस्था असल्याची माहिती दिली. यावर मा अध्यक्ष यांनी विचारणा केली की, राज्य स्तरावरुन नियुक्त केले त्या कामाच्या वावामध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या कामांचा समावेश होत नाही का ? यावर कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले की, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास राज्यस्तरावरुन प्राप्त पत्रान्वये कुंभमेळ्याच्या कामाकरीता राज्यस्तरावरुन निश्चित केलेल्या दराने कुंभमेळा प्राधिकरणास संस्था नियुक्त करण्याबाबत सुचित केले आहे. तसेच सदर संस्था नियुक्त करण्याचा मूळ प्रस्ताव हा १०.५० कोटींचा आहे. परंतु प्राधिकरणाची आवश्यकता विचारात घेऊन रक्कम रु. ७.०९ कोटींची आवश्यकता आहे.

शासकीय कामे करतांना कामाची आवश्यकता आणि इतर अनुषंगिक बाबी यांची खात्री करून सक्षम प्राधिकाऱ्याने प्रशासकीय मान्यता देणे हा पहिला टप्पा असून आणि त्यानंतर सदर प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार योग्य त्या कंत्राटदार / सेवा पुरवठादार यांची नेमणुक करणे हा त्याच्या पुढचा वेगळा टप्पा आहे. प्राधिकरणासमोर तुर्त प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे. त्यानुसार कामाची निकड पाहता प्राधिकरणाच्या वतीने रु. ७.०९ कोटींच्या कामास योग्य त्या सल्लागार संस्था नियुक्तीबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच विहीत कार्यपध्दतीचे पालन करून योग्य त्या संस्थेची नेमणूक करणेबाबत पुढील प्रक्रीया करावी, असे निर्देशित करण्यात आले.

**विषय क्र. ५ :- मुख्य नियंत्रण कक्ष (पोलीस मुख्यालय नाशिक ग्रामीण) जिल्हयात एकुण ४० पोलीस स्टेशन हे ICCC अंतर्गत येऊन एकूण २८ शिर्षकांखाली सदर निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.....**

पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी मुख्य नियंत्रण कक्ष (पोलीस मुख्यालय, नाशिक ग्रामीण) जिल्हयात एकुण ४० पोलीस स्टेशन हे ICCC अंतर्गत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत सूचित केले.

मा.अध्यक्ष महोदयांनी कुंभमेळ्यानंतर सदर साहित्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कोणाची असेल याबाबत चर्चा केली. त्यावर नाशिक ग्रामीण पोलीस विभागाने जबाबदारी घेण्याचे मान्य केले.

तसेच सदर कामाचे रु. २५.७२ कोटीस शिखर समितीची मान्यता असल्याने वाढीव कामाचे रकमेस शिखर समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात यावे असे मा.अध्यक्ष महोदयांनी नमूद केले व त्यानुसार, प्राधिकरणाच्या वतीने रु.३२.७५ कोटींच्या कामास शिखर समितीच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहून सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ६ :- सिंहस्थ कुंभमेळा च्या अनुषंगाने अस्तित्वातील घाट दुरुस्ती व संलग्न कामे करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.....**

अतिरिक्त आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सिंहस्थ कुंभमेळा च्या अनुषंगाने अस्तित्वातील घाट दुरुस्ती व संलग्न कामे करणे आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावर मा.अध्यक्ष महोदयांनी सुशोभीकरणाचे काम अनेक ठिकाणी होणार आहेत तरी त्या कामांमध्ये या कामांचा समावेश आहे का? सदर बाबींची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे सूचित केले. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त यांनी सदर कामाचे सादरीकरण केले, यामध्ये त्यांनी माहिती दिली की, यामध्ये सर्व जुन्या घाट परीसरातील नदीकिनारच्या जुन्या बांधकामांच्या भिंतींची डागडूजी (प्लास्टर व पेन्टींग) , घाटाकडे जाणा-या पाय-या व रस्ते, रेलींगची दुरुस्ती, पुलांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. यावर अध्यक्ष यांनी विचारणा केली की, पेन्टींगची कामे याद्वारे का करण्यात येत आहेत? कारण पेन्ट माय सिटी मध्ये पेन्टींगची बाब समाविष्ट आहे. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, पेन्ट माय सिटीच्या प्रयोजनार्थ आवश्यक सर्व प्रकारची प्रारंभिक कामे जसे भिंतींची दुरुस्ती, प्लास्टर करणे इत्यादी कामांचाच यामध्ये समावेश आहे त्यामुळे कोणत्याही कामाची द्विरुक्ती होणार नाही याची खबरदारी घेण्यात आली आहे.

सबब, या कामामध्ये समाविष्ट घटकांची इतर प्रकल्पांमध्ये द्विरुक्ती होणार नाही याची खबरदारी घेऊन काम करण्याच्या अटीवर प्राधिकरणाच्या वतीने रक्कम रु.४४.०४ कोटीचे कामांस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ७ :- मा.अध्यक्ष महोदयांच्या मान्यतेने ऐनवेळी / आयत्या वेळी घेण्यात येणारे विषय....**

अ) टेंट सिंटी :- कुंभमेळा आयुक्त यांनी टेंट सिटीबाबत राबवायच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर माहिती दिली. याबाबतचे सादरीकरण करीत असतांना मा. अध्यक्ष यांनी काही ठाराविक तत्वे नमूद केली. उदा. एका ठिकाणी प्रती खोली दोन भाविक / प्रवासी राहता येईल, अशी अट नमूद केली होती. अशा प्रकारच्या अटी ज्या सुरक्षितता, स्वच्छता किंवा सार्वजनिक हितांशी संबंधीत नाही आणि ज्यामुळे अर्थव्यवस्थेतील मार्केट फोर्सेसवर विनाकारण

बंधने येतील आणि / किंवा ज्यांची अंमलबजावणी करणे प्रशासनाला शक्य नाही, अशा अटी टाकू नये, अशा सुचना केल्या. तसेच साधारणत: Ease of Doing Business च्या तत्वाचे पालन करून लहान मोठे सर्व प्रकारच्या खाजगी व्यक्तींना टेंट किंवा टेंट सिटीज् योग्य त्या सुरक्षिततेसंबंधीत पुर्तता करून उभारता येतील, अशा पध्दतीनेच अटी, शर्ती ठेवाव्यात असे सूचित केले. जर एखादी कृती/काम अस्तित्वातील कायदे आणि नियम याचा विचार करता अनुज्ञेय असेल आणि त्यामुळे सुरक्षितता आणि सार्वजनिक हिताला बाधा येणार नसेल तर त्याबाबत अधिकची बंधने कार्यपध्दतीद्वारे किंवा S.O.P. द्वारे टाकू नयेत, अशीही सूचना करण्यात आली. याबाबत सादर केलेल्या अटी, शर्ती, वर्गीकरण इ. मध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, असे सूचित केले.

ब) साधु/संत/महंत/आश्रम/संस्था/मंदिर/संस्थाने निवड कार्यपध्दती- कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, नाशिक शहरातील ३ व त्र्यंबकेश्वर क्षेत्रातील १० प्रमुख आखाड्यांव्यतिरिक्त इतर महत्वपुर्ण साधु, संत, महंत, आश्रम, संस्था, मंदिर, संस्थान इत्यादी ठिकाणी पर्वणी काळात भाविकभक्त निवास करत असल्यामुळे मा. मुख्यमंत्री महोदयांनी अश्या साधु/ संत/महंत/आश्रम/संस्था/मंदिर/संस्थाने यांच्या शिफारशीवरुन आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करण्याकरीता निश्‍चित निधी उपलब्ध करुन देण्यात येईल अशी घोषणा केली आहे. तरी सदर संस्था/व्यक्ती निवड करण्याकरीता कार्यपध्दती तयार केली असल्याची व प्रस्ताव छाननी करुन प्राधिकरणास शिफारस करणेकरीता स्थानिक स्तरावर २ समित्या स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले- १ समिती नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावांकरीता मा. आयुक्त, नाशिक मनपा, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली काम करेल व दुसरी समिती इतर सर्व प्रस्तावांकरीता जिल्हाधिकारी नाशिक यांचे अध्यक्षतेखाली काम करेल. तसेच स्थानिक समित्यांनी सादर केलेल्या शिफारशींचे एकत्रीकरण करुन त्यातुन प्रस्ताव अंतिम करुन प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात येतील अशी माहिती दिली. मा. अध्यक्ष महोदयांनी सर्व प्रस्तावांचे एकत्रीकरण झाल्यानंतर एकत्रीत संख्या मिळाल्यास निधीचे नियोजन करणे योग्य होईल अशी सुचना केली व निवडीचे निकष व कार्यपध्दतीची माहिती घेतली. तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या सुचनांचा समावेश करुन कार्यपध्दती अंतिम करण्यात येईल असेही सांगीतले.

कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 02-07-2026 00:20:04

**(डॉ.प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक.**